**प्रेस नोट ता.२५/०६/२०२०**

## भोसरी एम.आय.डी.सी. येथे व्यापा-यास कोयत्याचा धाक दाखवुन लुटणारे दोन अल्पवयीन पोलीसांच्या ताब्यात

### पिंपरी चिंचवड, गुन्हे शाखा, युनिट १ ची कारवाई

दि.२१/०६/२०२० रोजी १९.०० वा. च्या सुमारास भोसरी एम.आय.डी.सी. येथील गुरूदत्त एंन्टरप्रायझेस चे मालक त्यांचे दुकानामध्ये असताना अनोळखी पाच इसमांनी त्यांना कोयत्याचा धाक दाखवुन दहशत निर्माण करून त्यांचे दुकानाचे गल्ल्यातील **दोन लाख रूपये व लॅपटॉप** जबरदस्तीने चेरून घेवुन गेले. त्याबाबत **भोसरी एम.आय.डी.सी. पो.स्टे येथे गु.रजि.नं.२९७/२०२० भादवि कलम ३९२,३४ आर्म ॲक्ट कलम ४(२५)** प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

गुन्हे शाखा, युनिट १ चे वपोनि उत्तम तांगडे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि गणेश पाटील, पोउनि काळुराम लांडगे व पोलीस पथक असे गुन्ह्याचा समातंर तपास करीत असताना रेकॉर्ड वरील गुन्हेगार व प्राप्त सी.सी.टिव्ही फुटेज, फिर्यादीचे कोणाशी वाद, फिर्यादीचे दुकानातील कामगार, यापुर्वी सोडुन गेलेले कामगार अशा अनेक शक्यतांच्या आधारे तपास करीत असताना बातमीदार यांचे संपर्कात राहुन सी.सी.टिव्ही फुटेज बातमीदारांना दाखविले होते. त्यावरून दि.२४/०६/२०२० रोजी **पो.शि.विजय मोरे** यांना मिळालेल्या माहिती वरून गांधीनगर, पिंपरी भागातुन दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे सखोल बारकाईने चौकशी केली असता त्यांनी त्यांच्या इतर ४ साथीदारांसह वरील गुन्हा केला असल्याचे निष्पन्न झाले. ताब्यात घेतलेल्या अल्पवयीन मुलांकडुन गुन्ह्यात चोरीस गेलेला लॅपटॉप हस्तगत करण्यात आलेला आहे.

ताब्यात घेतलेल्या अल्पवयीन मुलांकडे अधिक तपास करता त्यांनी व त्यांचे साथीदार यांनी वरील गुन्हा करणे पुर्वी नेहरूनगर, पिंपरी येथील पेट्रोल पंपावर दोन मोटार सायकली मध्ये पेट्रोल भरून जबरीने पाच हजार रूपये हिसकावून नेल्याचे निष्पन्न झाले असुन त्याबाबत **पिंपरी पो.स्टे. येथे गु.रजि.नं. ३८९/२०२० भादवि कलम ३९२,३४** अन्वये गुन्हा दाखल असल्याचे उघड झाले आहे. अल्पवयीन मुलांना पुढील कारवाई कामी भोसरी एम.आय.डी.सी. पो.स्टे. ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त श्री सुधिर हिरेमठ, सहायक पोलीस आयुक्त श्री आर.आर.पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट १ चे वपोनि उत्तम तांगडे, सपोनि गणेश पाटील, पोउनि काळुराम लांडे, पोलीस कर्मचारी विजय मोरे, प्रविण पाटील, आप्पा लांडे, किशोर परदेशी, अमित गायकवाड, सचिन मोरे, प्रमोद गर्जे, मनोजकुमार कमले, नितीन खेसे, गणेश सावंत यांनी केली आहे.